स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

मानव विज्ञान विद्याशाखा अंतर्गत मराठी विषयाच्या विद्यावाचस्पती (पीएच.डी.) पदवीकरिता सादर करावयाच्या शोधप्रबंधाचा आराखडा

संशोधन विषय

"मराठवाड्यातील लेखिकांच्या गद्य साहित्यातून आलेली स्त्री जाणीव:एक चिकित्सक अभ्यास"

(विशेष संदर्भ : ललिता गादगे,वृषाली किन्हाळकर व मधु सावंत)

संशोधिका

श्रीमती जयश्री परशुराम जाधव

एम.ए.मराठी, शिक्षणशास्त्र, बी.एड., डी .एड.

मोबईल नंबर :- ८२७५४५३१९७ /८२७५४५३१९६

ई मेल आय डी :-guttewadikarjay@gmail.com

प्रवर्ग :- वि.जा.अ (हिंदू-लमाणी)

संशोधन केंद्र

महाराष्ट्र उदयगिरी महाविद्यालय,उदगीर जिल्हा लातूर.

मार्गदर्शक
प्रा.डॉ. यादव रघुनाथ सूर्यवंशी
एम.ए. मराठी ,पीएच.डी., सेट, नेट
मराठी विभाग
महात्मा गांधी महाविद्यालय अहमदपूर
मोबईल नंबर :- ९८५०८५०३३०/८३२९३२१२९१

प्रस्तावना :-

मराठवाडा ही संतांची, पंतांची, विचारवंतांची, समाजसुधारकांची तसेच साहित्यिकांची भूमी म्हणून ओळखली जाते. मराठवाड्यातील साहित्यपरंपरा ही अत्यंत समृद्ध असून, मध्ययुगीन काळातील विविध संप्रदायातील साहित्यिकांची गद्य-पद्य साहित्य निर्मिती पासून ते आजच्या विज्ञानयुगातील वर्तमानकालीन साहित्यिकांच्या साहित्य निर्मितीचा विचार केल्यास त्यात आपणास खूप मोठी वैविध्यता आणि विपूलता ही दिसून येते. तसेच मराठवाड्यातील मराठी साहित्य क्षेत्रात कवी-लेखकांचे मोठे योगदान आहे. त्याचबरोबर कवयित्री व स्त्री लेखिकांचेही योगदान अत्यंत महत्त्वाचे राहिले आहे. त्यात मध्ययुगीन काळातील महानुभाव संप्रदायातील महदंबा किंवा वारकरी संप्रदायातील जनाबाई, मुक्ताबाई कान्होपात्रा, संत बहिणाबाई यांची नावे प्रामुख्याने घेता येतील.

मराठवाड्यातील आधुनिक मराठी साहित्याचा विचार केल्यास मराठी कविता, कथा, कादंबरी, चरित्र, आत्मचरित्र, आत्मकथा, ललितगद्य या साहित्य प्रकारांमध्ये मराठवाड्यातील कवयित्री व स्त्री लेखिकांनी अत्यंत मोलाची भर घातलेली आहे. साठोत्तरी वाड:मय प्रवाहातील दलित, ग्रामीण, स्त्रीवादी, आदिवासी, भटके-विमुक्त आदी साहित्यप्रवाहांचा विचार केल्यास मराठवाड्यातील लेखिकांनी आपल्या

साहित्याच्या माध्यमातून या साहित्य प्रवाहांना गती देण्याचे महत्त्वाचे कार्य केले आहे; असे म्हणता येते. या ठिकाणी वृंदा दिवाण, अनुराधा वैद्य, रेखा बैजल, लता मोहरीर, इंदुमती जोंधळे,अनुराधा पाटील, कविता महाजन, छाया महाजन, ललिता गादगे, उर्मिला चाकूरकर, वृषाली किन्हाळकर, मथु सावंत, संजीवनी तडेगावकर अशा अनेक लेखिकांची नावे घेता येतील. या लेखिकांनी आपल्या साहित्यातून आपल्या जाणीवेचे वेगळेपण दाखवून दिले आहे.

ललिता गादगे, वृषाली किन्हाळकर, मथु सावंत ह्या मराठवाड्यातील आज प्रतिथयश लेखिका म्हणून ओळखल्या जातात. मराठी कविता, कथा, ललित गद्य व कादंबरी या साहित्यप्रकारांतून त्यांनी महत्त्वपूर्ण लेखन केलेले आहे. वास्तविक आज शहरी- ग्रामीण, शिक्षित-अशिक्षित, शेतकरी, मजूर, नोकरदार, व्यावसायिक अशा सर्वस्तरातील मानवी जीवन झपाट्याने बदलत आहे. या बदलत्या परिस्थितीत स्त्रियांना कोणत्या प्रसंगांना सामोरे जावे लागत आहे. याचे चित्र संवेदनशील, स्त्री-लेखिका म्हणून ललिता गादगे, वृषाली किन्हाळकर व मथु सावंत यांनी आपल्या साहित्यातून कशाप्रकारे रेखाटले आहे. किंवा कोणत्या प्रकाराची स्त्री जाणीव त्यांच्या गद्य साहित्यातून प्रकट झालेली आहे हे पाहणे येथे महत्त्वाचे ठरते.

संशोधन विषयाचे महत्त्व:-

1) मराठवाड्यातील लेखिकांच्या गद्य साहित्यामध्ये ललिता गादगे,वृषाली किन्हाळकर व मथु सावंत यांच्या गद्य साहित्याचे असलेले वेगळेपण स्पष्ट करता येते.
2) ललिता गादगे, वृषाली किन्हाळकर व मथु सावंत यांच्या गद्य साहित्यातून आलेले स्त्री जाणिवेचे स्वरूप समजून घेता येते.
3) ललिता गादगे, वृषाली किन्हाळकर व मथु सावंत यांच्या गद्य साहित्यातून प्रकट झालेल्या स्त्री जाणिवेचे नाते, हे बदलत्या स्त्री जीवनाशी निगडित असल्याचे दाखवून देता येते.
4) मराठवाड्यातील गद्य साहित्य लेखिकांमध्ये ललिता गादगे, वृषाली किन्हाळकर व मथु सावंत यांचे स्थान अधोरेखित करता येते.

संशोधनाची उद्दिष्टे :-

प्रस्तुत संशोधन विषयाचा अभ्यास करण्यासाठी खालील प्रमाणे संशोधनाची उद्दिष्टे समोर ठेवण्यात आली आहेत

1) मराठी साहित्यक्षेत्रातील गद्य साहित्यामध्ये मराठवाड्यातील लेखिकांचे असलेले योगदान याचा अभ्यास करणे.

2) मराठवाड्यातील गद्य साहित्य क्षेत्रातील ललिता गादगे, वृषाली किन्हाळकर व मथु सावंत यांच्या गद्य साहित्याचे वेगळेपण स्पष्ट करणे.

3) ललिता गादगे, वृषाली किन्हाळकर व मथु सावंत यांच्या गद्य साहित्यातील स्त्री जाणीव यांचा अभ्यास करणे.

4) ललिता गादगे, वृषाली किन्हाळकर व मथु सावंत यांच्या गद्य साहित्यातील स्त्री जाणिवेचे वेगळेपण अधोरेखित करणे.

संशोधनाची गृहितके :-

प्रस्तुत संशोधन विषयाच्या अभ्यासाची गृहितके खालील प्रमाणे सांगता येतील.

१) ललिता गादगे, वृषाली किन्हाळकर व मथु सावंत यांच्या गद्य साहित्यातून स्त्री जाणीव प्रकट झालेली आहे.

२) ललिता गादगे, वृषाली किन्हाळकर व मथु सावंत यांच्या गद्य साहित्यातून प्रकट झालेली स्त्री जाणीव हि विविध अंगी स्वरूपाची आहे.

३) ललिता गादगे, वृषाली किन्हाळकर व मथु सावंत यांच्या गद्य साहित्यातून प्रकट झालेल्या स्त्री जाणिवेचे नाते हे बदलत्या स्त्री जीवनाशी निगडित आहे.

४) ललिता गादगे, वृषाली किन्हाळकर व मथु सावंत यांच्या गद्य साहित्यातून प्रकट झालेले स्त्री जाणीव ही मराठवाड्यातील गद्य साहित्याचे जाणीवेचे क्षेत्र विस्तृत करणारी आहे.

संशोधनाच्या मर्यादा:-

१) प्रस्तुत संशोधन हे मराठवाड्यातील लेखिकांच्या गद्य साहित्याशी संबंधित आहे.

२) प्रस्तुत संशोधन फक्त ललिता गादगे, वृषाली किन्हाळकर व मथु सावंत या लेखिकांच्या गद्य साहित्याशीच संबंधित आहे.

३) प्रस्तुत संशोधन हे ललिता गादगे, वृषाली किन्हाळकर व मथु सावंत यांच्या गद्य लेखनातून आलेल्या स्त्रीजाणिवेशी संबंधित आहे.

संशोधन पद्धती:-

प्रस्तुत संशोधनाचा अभ्यास हा विवेचनात्मक, निरीक्षणात्मक, विश्लेषणात्मक व वर्णनात्मक दृष्टिकोनातून केला जाणार आहे.

प्रकरणाची रूपरेषा:-

प्रकरण पहिले:- मराठवाड्यातील मराठी साहित्य: परंपरा आणि वाटचाल

प्रकरण दुसरे:- ललिता गादगे, वृषाली किन्हाळकर व मथु सावंत यांचा जीवन परिचय व वाड:मयीन कार्य .

प्रकरण तिसरे :- ललिता गादगे, वृषाली किन्हाळकर व मथु सावंत यांच्या कथा साहित्यातून आलेली स्त्री जाणीव.

प्रकरण चौथे:- ललिता गादगे, वृषाली किन्हाळकर व मथु सावंत यांच्या ललित गद्य साहित्यातून आलेली स्त्री जाणीव.

प्रकरण पाचवे:- ललिता गादगे, वृषाली किन्हाळकर व मथु सावंत यांच्या कादंबरी साहित्यातून आलेली स्त्री जाणीव .

प्रकरण सहावे :- उपसंहार व निष्कर्ष

संदर्भ ग्रंथ व नियतकालिके :-

१) मराठवाड्यातील साहित्य- डॉ. प्रल्हाद लुलेकर, कैलास पब्लिकेशन,औरंगाबाद.

२) निजामकालीन मराठवाडी साहित्य- डॉ. साहेब खंदारे लोकविद्या प्रकाशन,परभणी.

३) ‘आयुष्याच्या काठाकाठाने’ (कथासंग्रह) ललिता गादगे.

४) ‘दुःख आणि अश्रू’ (कथासंग्रह) ललिता गादगे.

५) ‘प्राजक्ताची फुले आणि दाह’ (कथासंग्रह) ललिता गादगे.

६) ‘खिडकीतील आभाळ’ (ललित गद्य) ललिता गादगे.

७) ‘नाळबंधाची कहाणी’ (ललित गद्य) ललिता गादगे.

८) ‘संवेद्य’ (ललित लेखसंग्रह) वृषाली किन्हाळकर.

९) ‘सहजतरंग’ (ललित लेखसंग्रह) वृषाली किन्हाळकर.

१०) ‘पाण्यातील पायवाट’ (कथासंग्रह) मथु सावंत.

११) ‘तिची वाटच वेगळी’ (कथासंग्रह) मथु सावंत.

१२) ‘पाणबळी, (कथासंग्रह) मथु सावंत.

१३) ‘राहू केतू’ (कादंबरी) मथु सावंत.

१४) ‘ जिनगाणी’ (कादंबरी) मथु सावंत.

नियतकालिके :-

१) प्रतिष्ठान

२) अक्षरगाथा

३) अक्षर वाङःमय

४)अस्मितादर्श

संशोधिका

श्रीमती जयश्री परशुराम जाधव

मार्गदर्शक

प्रा.डॉ. यादव रघुनाथ सूर्यवंशी

एम.ए.

मराठी,पीएच.डी.,सेट,नेट

दिनांक २५/०८/२०२३

प्रति,

मा. कुलसचिव,
पदव्युत्तर विभाग,
स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ,नांदेड

विषय:- पीएच.डी. संशोधन आराखडा स्वीकारणे बाबत.

महोदय,

उपरोक्त विषयांस अनुसरून आपणास विनंती करण्यात येते की, माझ्या मार्गदर्शनाखाली श्रीमती जयश्री परशुराम जाधव या मराठी विषयांमध्ये “मराठवाड्यातील लेखिकांच्या गद्य साहित्यातून आलेली स्त्री जाणीव: एक चिकित्सक अभ्यास” (विशेष संदर्भ: ललिता गादगे, वृषाली किन्हाळकर, व मथु सावंत) या विषयांमध्ये संशोधन कार्य करीत आहेत. त्यांनी निवडलेल्या विषयाचा संशोधन आराखडा स्वीकारून उपकृत करावे ही विनंती.

संशोधन मार्गदर्शक
प्रा.डॉ. यादव रघुनाथ सूर्यवंशी
एम.ए.
मराठी,पीएच.डी.,सेट,नेट
मराठी विभाग